लोकमत

# प्रशासकीय सेवकांच्या संशोधनाला प्रोत्साहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयातील प्रशासकीय सेवकांच्या संशोधन कार्यास चालना देण्यासाठी कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजना सुरू करण्यात आली आहे. त्याला विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. विद्यापीठात पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यापीठ अथवा कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयातील प्रशासकीय सेवकांना पीएच.डी. ट्युशन फी आणि प्रयोगशाळा शुल्कात २५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांना वैद्यकीय आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध असल्याने त्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमास लागू असणारे वैद्यकीय शुल्क आणि ग्रंथालय शुल्क आकारण्यात येणार नाही.

तरूण भारत



# प्रशासकीय सेवकांच्या संशोधनास कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजना

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील प्रशासकीय सेवकांच्या संशोधनाला चालना देण्यासाठी 'कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजना' लागू केली आहे. या योजनेअंतर्गत विद्यापीठात पीएच. डी. ला प्रवेश घेणाऱ्या विद्यापीठातील व संलग्न महाविद्यालयातील प्रशासकीय सेवकाला ट्यूशन व लायब्ररी फीमध्ये २५ टक्के सवलत दिली जाणार आहे. विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांना वैद्यकीय व ग्रंथालय शुल्क तर महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय शुल्क आकारणार नाही. तसेच पीएच. डी. अभ्यासक्रम लागू असणाऱ्या ग्रंथालय शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. हा निर्णय कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजनेअंतर्गत विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतला आहे, अशी माहिती परिपत्रकाद्वारे विद्यापीठ प्रशासनाने प्रसिद्ध केली आहे.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संलग्नित कलाप्रबोधिनी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या शैक्षणिक कामाचे प्रदर्शन भालजी पेंढारकर केंद्रात आयोजित केले आहे. त्याचे उद्घाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले.

# 'कलाप्रबोधिनी'च्या प्रदर्शनाला प्रतिसाद

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ संलग्न कलाप्रबोधिनी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनमधील इंटेरियर डिझाईनच्या विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या कलाकृतीचे प्रदर्शन भालजी पेंढारकर केंद्रात झाले. प्रदर्शनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी विश्वकर्मा विद्यापीठाचे उपसंचालक प्रा. प्रशांत आचार्य, प्रा. आकाश आलेगावकर, संस्थेचे अध्यक्ष विजय गजबर, प्राचार्या गीरिजा कुलकर्णी, विश्वस्त जयंत बेगमपुरी आदी उपस्थित होते.

प्रदर्शनात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेले विविध डिझाईन प्रोजेक्ट मांडले आहेत. ऑडिओ, व्हिडिओ प्रेझेंटेशनच्या माध्यमातून प्रा. प्रशांत आचार्य, प्रा. आकाश आलेगावकर यांनी विविध क्षेत्रांतील संधी तसेच उच्च शिक्षणाबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. जे विद्यार्थी बारावी पास झालेले आहेत आणि त्यांना इंटेरियर डिझाईनमध्ये करिअर करायचे आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी हे प्रदर्शन खूपच मार्गदर्शक ठरणार आहे. त्यामुळे सर्व पालक व विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमांबाबत माहिती घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. आदिती ललित हिने आभार मानले.

21 JUN 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनास चालना मिळण्यासाठी कुलगुरू प्रोत्साहन योजना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील प्रशासकीय सेवकांच्या संशोधन कार्यास चालना मिळण्यासाठी कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजनेस अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे.

विद्यापीठात पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या व संलग्न महाविद्यालयातील प्रशासकीय सेवकांना पीएच.डी. ट्युशन व लॅबोरटरी फी मध्ये २५ टक्के सवलत असणार आहे. विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांना वैद्यकीय व ग्रंथालय सुविधा उपलब्ध असल्याने त्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमास लागू असणारे वैद्यकीय व ग्रंथालय शुल्क आकारण्यात येणार नाही. संलग्नित महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय शुल्क आकारण्यात येणार नाही. तसेच त्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमास लागू असणाऱ्या ग्रंथालय शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येईल, असे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सोमवारी काढलेल्या परिपत्रकात म्हटले आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

21 JUN 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्या न्यूज अँकरिंग कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन व शहीद वीर माता महाविद्यालय, टिटवे यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि. २२) रोजी न्यूज अँकरिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेत एस. न्यूज वृत्तवाहिनीचे प्रोग्रामिंग कॉर्डिनेटर चेतन मिठारी व न्यूज अँकर पल्लवी गोखले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या नवीन इमारतीमध्ये कार्यशाळा होईल. दुपारी १२ ते ३ वेळेत होणाऱ्या कार्यशाळेत न्यूज अँकरिंगचा डेमो होणार आहे. सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासाठी https://forms.gle/6NDoztJiDCUmWQcF8 या लिंकवर नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. कार्यशाळेमध्ये विद्यार्थी, पत्रकार व डिजिटल मीडियात करिअर करू इच्छिणाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# सेवकांना संशोधनासाठी विद्यापीठाचे प्रोत्साहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ तसेच संलग्न महाविद्यालयांतील प्रशासकीय सेवकांच्या संशोधन कार्यास विद्यापीठ प्रशासनातर्फे प्रोत्साहन देण्यात येणार आहे. यामध्ये कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजनेंतर्गत विद्यापीठ अधिकार मंडळाने विविध सवलतींना मान्यता दिली आहे.

यामध्ये पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयांतील प्रशासकीय सेवकांना ट्यूशन फी व लॅबोरेटरी फीमध्ये २५ टक्के सवलत देण्यात येईल. विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांना वैद्यकीय व ग्रंथालय सुविधा उपलब्ध आहे. त्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमास लागू असणारे वैद्यकीय शुल्क व ग्रंथालय शुल्क आकारण्यात येणार नाही, तसेच संलग्नित महाविद्यालयांतील प्रशासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय शुल्क आकारण्यात येणार नाही. पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या ग्रंथालय शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येईल. याबाबतचे आदेश विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सर्व संलग्नित महाविद्यालयांना दिले आहेत.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठातील एमबीएच्या विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील एमबीए युनिट आणि सेंट्रल प्लेसमेंट विभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये एमबीए युनिटमधील विद्यार्थ्यांनी यश मिळवले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार डॉ. श्रीकृष्ण एस. महाजन यांच्या हस्ते झाला. स्वागत व प्रास्ताविक डॉ. अनुप मुळे यांनी केले. आभार डॉ. रामदास बोलके यांनी मानले. डॉ. दीपा इंगवले व डॉ. गंधाली खारगे आदी उपस्थित होत्या. कॅम्पस प्लेसमेंट आयोजित करण्यासाठी डॉ. गजानन राशिनकर, प्रमोद सामुद्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर डॉ. नवनीत सांगळे



नवनीत सांगळे

**कोल्हापूर :** डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे गणित विभागप्रमुख प्रा. डॉ. नवनीत सांगळे यांची शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर निवड झाली आहे. गणित विषयातील अध्यापन, संशोधन यांचा १८ वर्षांहून अधिक काळ अनुभव असलेले डॉ. सांगळे यांची शिवाजी विद्यापीठाच्या स्थायी समितीच्या शिफारशीनुसार गणित शास्त्र विभागाच्या अभ्यासमंडळावर निवड झाली आहे. डॉ. सांगळे हे सध्या डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष विभागप्रमुख व गणित विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे ४५ शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. इंजिनिअरिंग मॅथ्स या विषयावरील ६ पुस्तकांचे लेखन त्यांनी केले असून, दोन पेटंटही त्यांच्या नावे नोंद आहेत. डॉ. सांगळे यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष गृह राज्यमंत्री सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिल कुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोष चेडे, रजिस्ट्रार डॉ. लितेश मालदे यांनी अभिनंदन केले आहे.

तरुण भारत

# विद्यापीठात योगदिनानिमित्त सामूहिक योग प्रशिक्षण

कोल्हापूर : आठव्या आंतरराष्ट्रीय योगदिनी शिवाजी विद्यापीठात आज (दिन २१) रोजी सकाळी ७:२० ते ८:३० या वेळेत सामुहिक योग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. विद्यापीठाशी संबंधित सर्व घटक, अधिकारी, कर्मचारी, सर्व अधिविभागाचे प्राध्यापक, नियमित व संशोधक विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यार्थी विकास केंद्राच्या संचालकांनी केले आहे.